


# बी द चेंज फाउंडेशन

रजिस्टेशन नंबर:-MH/220/22

## आयोजित

# राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६

पुष्प तृतीय ...



BE THE CHANGE FOUNDATION

चला बदल घडवू या...

/bethechangemaha

## संस्थेविषयी थोडक्यात

बी द चेंज फाउंडेशन ही महाराष्ट्र शासनाच्या धर्मादाय आयुक्त नोंदणीकृत असलेली शैक्षणिक व इतर अनेक सामाजिक क्षेत्रात काम करणारी एक नावाजलेली संस्था आहे.

## पुरस्काराविषयी थोडक्यात

मेहनती, होतकरू व उपक्रमशील शिक्षकांना ओळखून त्यांचा सन्मान करण्याच्या उदात्त हेतूने या बी. द. चेंज फाउंडेशन राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५ चे आयोजन करण्यात येत आहे.

## पुरस्काराचे वेळापत्रक

| अ.नु. | कार्यवाहीतारीख | दिनांक |
| --- | --- | --- |
| १ | जाहिरात प्रसिद्धी | ०५/१०/२०२५ |
| २ | नामनिर्देशन शुल्क भरणे अंतिम तारीख | १५/०१/२०२६ |
| ३ | प्रस्ताव ऑनलाईन पद्धतीने अथवा पी. डी. एफ. स्वरुपात व्हाट्सॲप अथवा ईमेल द्वारे पाठवणे | २०/०१/२०२६ |
| ४ | तज्ञ समितीकडून नामनिर्देशन प्रस्ताव पडताळणी | २१/०१/२०२६ |
| ५ | तात्पुरते स्वरुपात निवड यादी | २५/०१/२०२६ |
| ६ | अंतिम निवड यादी वेबसाईट व इतर ठिकाणी प्रसिद्ध करणे | २७/०१/२०२६ |
| ७ | पुरस्कार वितरण समारंभ | ०१/०२/२०२६ |

** सदर वेळापत्रकात अनपेक्षित बदल झाल्यास नामनिर्देशन प्रस्ताव दाखल केलेल्या सर्व शिक्षकांना ईमेल व व्हाट्सॲप द्वारे सूचित करण्यात येईल.

# पुरस्काराचे स्वरूप

## राज्यस्तरीय आदर्श शिक्षक

**पुरस्काराचे स्वरुप- इलेक्ट्रॉनिक गिफ्ट व ट्रॉफी**

मान्यवरांच्या हस्ते शाल व सन्मानपत्र

# सर्व सहभागी शिक्षक






बी द चेंज फाउंडेशन

चला बदल घडवू या...

शिर्डी, जिल्हा अहिल्यानगर, महाराष्ट्र

रजिस्ट्रेशन नंबर:-MH/220/22

राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६

सन्मानपत्र

हे प्रमाणित करण्यात येते की,

-----------------------------------------------------------

यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६

प्रदान करण्यात येत आहे, त्यांच्या शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदान, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले अथक प्रयत्न आणि शैक्षणिक व सहशालेय कार्यातील आदर्श सेवेसाठी त्यांची निष्ठा, समर्पण भावना आणि परिश्रम ही अनेक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरले आहेत.

अध्यक्ष
बी द चेंज फाउंडेशन

दिनांक: १ फेब्रुवारी २०२६
पुरस्कार प्रदान ठिकाण: शिर्डी, महाराष्ट्र

## मान्यवरांच्या हस्ते शाल व सन्मानपत्र

## उद्दिष्टे

**उत्कृष्ट शिक्षकांची समाजाला ओळख** - समर्पित वृत्तीने काम करणाऱ्या शिक्षकांना दरवर्षी शासनाच्या विविध विभागाद्वारे व स्वयंसेवी संस्थांद्वारे आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविले जाते. परंतु अनेक मेहनती, होतकरू व उपक्रमशील शिक्षक अशा पुरस्कारांपासून वंचित राहतात व त्यांचे कार्य समाजापर्यंत पोचत नाही. अशा शिक्षकांना ओळखून त्यांचा सन्मान करणे.

**शिक्षकांना प्रोत्साहन** - तालुका, जिल्हा आणि राज्य स्तरावरील शिक्षकांना त्यांच्या अनुकरणीय कार्यासाठी पुरस्कार देऊन प्रेरित करणे आणि इतरांना त्यांच्या पावलावर पाऊल ठेवण्यास प्रेरित करणे.

समावेशक मान्यता- ज्या शिक्षकांना यापूर्वी जिल्हा परिषद, राज्य किंवा राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित केले गेले नाही अशा शिक्षकांना संधी दिली जाईल ज्यामुळे पुरस्कार अधिक समावेशक होईल.

**निवडक शाळांना देणगी** - निवडक शाळांना उपयुक्त डिजिटल साहित्य देणगी म्हणून प्रदान करून, शिक्षणाच्या डिजिटल परिवर्तनास समर्थन देऊन शाळांच्या विकासासाठी योगदान देणे.

**राज्यव्यापी सहभाग** - राज्यभरातून प्रस्ताव मागवणे आणि विविध स्तरांवर-राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय आणि तालुकास्तरीय शिक्षकांना पुरस्कृत करणे त्याद्वारे शिक्षकांच्या विस्तृत श्रेणीपर्यंत पोहोचणे आणि सर्व स्तरांवर शैक्षणिक उत्कृष्टतेला प्रोत्साहन देणे.

**सर्व माध्यमांच्या शाळांतील शिक्षकांचा सन्मान** - मराठी, हिन्दी, इंग्रजी व उर्दू मध्यामतील खाजगी व सरकारी शाळांतील शिक्षकांना सन्मानित करणे.

**उच्च शिक्षणामध्ये योगदान देणारे शिक्षक** - ११ वी ते पोस्ट ग्रॅज्युएशन पर्यन्त ज्ञानदानाचे कार्य करत असलेल्या शिक्षकांना सन्मानित करणे.

**देणगी** - देणगी स्वरुपात प्रस्ताव सादर करत असतांना शिक्षकांना भराव्या लागणाऱ्या रु. ~~१००००~~/- रु. ४९९९/- इतक्या नामनिर्देशन शुल्काचा वापर ग्रामीण भागातील शाळांना डिजिटल साहित्य देणगी स्वरुपात देऊन सक्षम बनविणे.

## वैशिष्ट्ये

**पारदर्शक निवड प्रक्रिया** - निवृत्त शिक्षणाधिकारी आणि पुरस्कारप्राप्त शिक्षकांचा समावेश असलेल्या तज्ञ समितीच्या सहभागाद्वारे शिक्षकांची छाननी आणि निवड यामध्ये पारदर्शकता राखण्यासाठी, मूल्यमापन प्रक्रियेत निष्पक्षता आणि विश्वासार्हता सुनिश्चित करणे.

**डिजिटल रेकॉर्ड मेंटेनन्स** - सर्व प्राप्त प्रस्तावांचे डिजीटल रेकॉर्ड मेंटेन केले जाईल.

**प्रस्ताव सादरीकरण सुलभता** - शिक्षक ऑनलाईन फॉर्म भरुन किंवा वेबसाईट वरुन फॉरमॅट डाउनलोड करून आपल्या सोई प्रमाणे प्रस्ताव ऑनलाईन किंवा ऑफलाईन दोन्ही पद्धतीने सादर करू शकतात.

**किमान नामनिर्देशन शुल्क** - प्रस्ताव सादर करण्यासाठी रु. ~~१००००~~/- रु. ४९९९/-इतके नामनिर्देशन शुल्क आहे. या जमा झालेल्या शुल्काचा वापर ग्रामीण भागातील शाळांना देणगी स्वरु पात डिजिटल शैक्षणिक साहित्य देण्यासाठी करण्यात येणार आहे.

**नावाजलेली संस्था** - बी. द. चेंज फाउंडेशन ही महाराष्ट्र राज्यातील शैक्षणिक क्षेत्रात काम करणारी एक नावाजलेली संस्था आहे त्यामुळे या पुरस्कार सोहळ्याला अनन्य साधारण महत्व प्राप्त होणार आहे.

**मान्यवरांची उपस्थिती** - पुरस्कार सोहळ्याला राजकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील नामांकित व्यक्तींना आमंत्रित केले जाणार आहे त्यांची माहिती लवकरच वेबसाईट वर टाकण्यात येईल.

**इंग्लिश मिडियम** - खाजगी इंग्लिश मिडियम शाळांतील शिक्षकही या पुरस्कार सोहळ्या साठी आपला नॉमिनेशन फॉर्म भरु शकतात.

**हिन्दी व उर्दू मिडियम** - हिन्दी व उर्दू मिडियम शाळांतील शिक्षकही या पुरस्कार सोहळ्या साठी आपला नॉमिनेशन फॉर्म भरु शकतात.

**नामनिर्देशन शुल्क** - प्रस्ताव सादर करण्यासाठी भरावे लागणारे नामनिर्देशन शुल्क रु. ~~१००००~~/- रु. ४९९९/-हे QR Code, ऑनलाईन लिंक द्वारे, क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड किंवा नेटबँकिंग सुविधे द्वारे संस्थेच्या अधिकृत पेमेंट गेटवे द्वारे भरता येईल.

## प्रस्ताव दाखल करण्यासाठी आवेदन प्रक्रिया

१. www.shikshakpuraskar.in या वेबसाईट ला भेट द्या.
२. www.shikshakpuraskar.in या वेबसाईट ला भेट द्यावी व 'प्रस्ताव सादर करा या लिंक वर क्लिक करावे
३. या लिंक वर क्लिक केल्यानंतर एक फॉर्म ओपन होईल त्यात शिक्षकांनी आपली सर्व माहिती व्यवस्थित भरावी
४. फॉर्म मध्ये माहितीसोबतच फोटोज, व्हिडिओज, पीडीएफ फाइल, वर्ड फाइल, युट्यूब व्हिडिओ च्या लिंक, ब्लॉग अथवा वेबसाईट ची लिंक अशी सर्व माहिती अपलोड करणाचे पर्याय दिलेले आहेत.
५. ज्या शिक्षकांना ऑनलाईन पद्धतीने प्रस्ताव दाखल करण्यास अडचण येत असेल त्यांनी वेबसाईट वर ऑफलाईन प्रस्ताव अर्ज नमूना या लिंक वर क्लिक करून पीडीएफ फाइल डाउनलोड करावी व या विहित नमुन्यात लेखी अर्ज भरुन सोबत आवश्यकत ते कागदपत्रे अथवा इतर गोष्टी अटॅच करून संस्थेचा shikshakpuraskar2025@gmail.com या ईमेल आय डी वर पाठवावेत.

## पुरस्कार मिळाल्याचे फायदे

१) **मान्यता आणि सन्मान:** शिक्षकांना त्यांच्या समर्पण आणि शिक्षणातील उत्कृष्ट योगदानाबद्दल सार्वजनिक पोचपावती मिळेल, याने त्यांची व्यावसायिक प्रतिष्ठा आणि वैयक्तिक समाधान वाढेल
२) **प्रेरणा आणि प्रोत्साहन:** पुरस्कार मिळाल्याने मनोबल वाढेल, शिक्षकांना त्यांचे उत्कृष्ट कार्य सुरू ठेवण्यासाठी प्रेरणा मिळेल आणि शैक्षणिक क्षेत्रातील इतरांना उत्कृष्टतेसाठी प्रयत्न करण्याची प्रेरणा मिळेल
३) **करिअर ॲडव्हान्समेंट:** हा पुरस्कार मिळाल्याने शिक्षकाच्या क्रेडेन्शियल्समध्ये भर पडेल, भविष्यातील करिअरच्या संधी, पदोन्नती आणि शैक्षणिक समुदायामध्ये अधिक व्यावसायिक आदराचे दरवाजे उघडतील
४) **नेटवर्किंगच्या संधी:** पुरस्कार विजेत्यांना इतर शिक्षक, तज्ञ आणि शैक्षणिक क्षेत्रातील नेत्यांशी संपर्क साधण्याची, व्यावसायिक संबंध वाढवण्याची आणि ज्ञानाची देवाणघेवाण करण्याची संधी मिळेल
५) **समाजात आणि विद्यार्थ्यांत आदरचे स्थान:** पुरस्कार विजेत्यांना विद्यार्थी, पालक आणि समाजाकडून वाढीव आदर आणि प्रशंसा मिळेल आणि शिक्षणातील प्रभावी नेतृत्व म्हणून त्यांची भूमिका अधिक दृढ होईल.
६) **शासकीय पुरस्कारासाठी प्रस्ताव सादर करतांना उपयोग:** बी द चेंज ही शैक्षणिक क्षेत्रातील एक नावाजलेली संस्था आहे या संस्थेचा पुरस्कार मिळालेला असणे ही बाब शिक्षक जेंव्हा जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका, राज्य व केंद्र शासनाच्या पुरस्कारासाठी नॉमिनेशन फॉर्म व प्रस्ताव दाखल करतील तेंव्हा सोबत जोडता येऊ शकते. याचा फायदा शासकीय पुरस्कार मिळण्यासाठी होईल.
७) **आकर्षक डिजिटल भेटवस्तू:** ज्यामध्ये सर्व शिक्षकांना इलेक्ट्रॉनिक गिफ्ट, ट्रॉफी, सन्मानपत्र व शाल देऊन त्यांचा सन्मान प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते केला जाईल. याचा त्यांना शैक्षणिक कामात नक्कीच उपयोग होईल.
८) **डिजिटल सन्मानपत्र:** राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार विजेते वगळता इतर सर्व शिक्षकांना पोस्टाने ट्रॉफी सन्मानपत्र पाठविण्यात येईल, पाठविण्याचा खर्च शिक्षकांकडून घेतला जाईल.

## राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६ साठी खालीलप्रमाणे वैशिष्ट्ये

**१) सर्व पुरस्कारार्थींसाठी सन्मानसोहळा**
सर्व सहभागी शिक्षकांना गौरव म्हणून इलेक्ट्रॉनिक गिफ्ट, ट्रॉफी, सन्मानपत्र व शाल देण्यात येईल.

**२) विजेत्यांसाठी विशेष बक्षीस**
अंतिम निवड झालेल्या आदर्श शिक्षकांना विशेष आकर्षक गिफ्ट देण्यात येईल.

**३) नामांकन शुल्क- ~~१००००~~/-**
पुरस्कारासाठी अर्ज करण्यासाठी शुल्क-४९९९/- असून, यामध्ये संपूर्ण प्रक्रियेचा समावेश आहे.

**४) हमीपत्र आवश्यक**
प्रत्येक उमेदवाराने स्वखर्चाने येण्याचे आणि निर्णयास मान्यता देण्याचे हमीपत्र अनिवार्यपणे भरायचे आहे.

**५) योग्य माहिती**
सर्व सहभागी शिक्षकांना पूर्ण प्रक्रिया, टप्पे, वेळापत्रक व मूल्यांकन निकष यांची स्पष्ट माहिती दिली जाईल.

**६) पारदर्शक व निकोप पडताळणी प्रक्रिया**
सर्व अर्जांची पारदर्शकतेने पडताळणी केली जाईल. कोणत्याही प्रकारचा पक्षपात किंवा अन्याय होणार नाही.

**६) फाईल अपडेट व तपशीलवार मूल्यांकन**
उमेदवारांची फाईल अपडेट केली जाईल. मॉक टेस्ट, कार्यपद्धती आणि योगदानाच्या माहितीच्या आधारे फायनल फाईल तयार केली जाईल.

## २४*७ हेलपलाईन

राज्यातील शिक्षकांना प्रस्ताव दाखल करण्यासाठी व नॉमिनेशन फॉर्म भरण्यासाठी किंवा संस्थेविषयी किंवा संस्थेच्या पदाधिकारी यांच्या विषयी कसल्याही चौकशी करायची असल्यास अथवा तांत्रिक मदत हवी असल्यास खालील प्रमाणे हेलपलाईन उपलब्ध असेल.

८७९६६९६९६०, ९०९१११०७०७ हा हेलपलाईन नंबर २४ तास सुरु असेल

८७९६६९६९६०, ९०९१११०७०७ या क्रमांकावर आपण २४ तास कधीही मेसेज करू शकता

www.shikshakpuraskar.in या वेबसाईट वर २४*७ लाईव्ह चॅट उपलब्ध

shikshakpuraskar2025@gmail.com या इमेलद्वारे आपण कधीही संपर्क करू शकता

राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६ चे नामनिर्देशन शुल्क रु.~~१००००/~~- रु.४९९९/- भरण्यासाठी खालील प्रमाणे पेमेंट ऑप्शन्स उपलब्ध आहेत.

PhonePe, Google Pay, Paytm कोणत्याही App द्वारे संस्थेचा QR Code Scan करुन

Scan QR to pay

**BE THE CHANGE FOUNDATION**
**TID: 68073663**

## प्रस्तावासाठी आवश्यक अटी

१. महाराष्ट्र राज्यातील मान्यताप्राप्त शाळेत (प्राथमिक, माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक) शिक्षक म्हणून सेवेत असावा.
२. मराठी, इंग्रजी व उर्दू माध्यमाच्या कोणत्याही सरकारी, निमसरकारी, खाजगी, स्थानिक स्वराज संस्था यांच्या शाळांमध्ये सेवेत असलेले शिक्षक प्रस्ताव दाखल करण्यासाठी पात्र आहेत.
३. स्टेट बोर्ड, सी. बी. एस. ई. व आय. जी. सी. एस. ई. बोर्डाच्या शाळांतील शिक्षक प्रस्ताव दाखल करण्यास पात्र आहेत.
४. शिक्षक एकूण सेवा किमान १ वर्षे आवश्यक.
५. शिक्षक निर्व्यसनी असावेत अंतिम निवड यादी जाहीर करतांना तज्ञ समितीमार्फत शिक्षक ज्या शाळेत कार्यरत आहे त्या शाळेच्या व्यवस्थापनाशी संपर्क करून या गोष्टीची खातरजमा केली जाईल.
६. शिक्षकांनी खाजगी शिकवणीत सहभागी होऊ नये.
७. शाळेला UDISE Code असणे आवश्यक. मान्यता नसलेल्या शाळा. खाजगी शिकवणी वर्गातील शिक्षक. खाजगी ऑनलाईन पोर्टल अथवा वेबसाईट वर अध्यापन करणाऱ्या व्यक्ती.
८. पूर्व प्राथमिक शाळा शिक्षक प्रस्ताव दाखल करण्यास पात्र आहेत.
९. प्रस्ताव दाखल करत असतांना शिक्षकांनी दिलेली माहिती व पुरावे हे चुकीची अथवा दिशाभूल करणारी नसावी.
१०. प्रस्ताव दाखल करणाऱ्या शिक्षकांची कसल्याही प्रकारची विभागीय चौकशी सुरु नसावी.
११. कोणत्याही कारणास्तव निलंबित असलेले शिक्षक प्रस्ताव दाखल करण्यास पात्र नाहीत.
१२. राज्य अथवा केंद्र शासनाचे आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक यांनी कृपया नामनिर्देशन प्रस्ताव दाखल करू नयेत. सदर शिक्षकांनी कृपया फोन व ईमेल द्वारे बी. द. चेंज फाउंडेशन ला संपर्क करून आपले बहुमूल्य मार्गदर्शन करावे.

## प्रस्तावासाठी आवश्यक निकष

१. शैक्षणिक संशोधनपर निबंध / प्रबंध यास प्राप्त पुरस्कार व सादरीकरण
२. वृतपत्र अथवा प्रथितयश नियतकालिकात प्रकाशित लेख वैचारिक किंवा विश्लेषणात्मक
३. स्टेट बोर्ड, सी. बी. एस. ई. व आय. जी. सी. एस. ई. बोर्डाच्या शाळांतील शिक्षक प्रस्ताव दाखल करण्यास पात्र आहेत.
४. शिक्षक शिकवत असलेल्या वर्गातील त्या त्या अध्यापन विषयाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांस विविध क्षेत्रातील प्राप्त पुरस्कार कला, क्रीडा, संगीत, नृत्य, भाषा, गणित, सामाजिक शास्त्र, स्काऊट गाईड, चित्रकला, खेळ, वकृत्व इ
५. शिक्षक निर्व्यसनी असावेत अंतिम निवड यादी जाहीर करतांना तज्ञ समितीमार्फत शिक्षक ज्या शाळेत कार्यरत आहे त्या शाळेच्या व्यवस्थापनाशी संपर्क करून या गोष्टीची खातरजमा केली जाईल.
६. शिक्षकाने केलेले सामाजिक, साहित्यिक, सांस्कृतिक क्षेत्रातील कार्य तसेच आपत्ती व्यवस्थापन, राष्ट्रीय कार्य इ. इतर स्वयंसेवी संस्थेकडून प्राप्त पुरस्कार
७. शिक्षकाने शाळेच्या उन्नतीसाठी समाजाकडून मिळवलेले योगदान डिजिटल साहित्य इ. प्रशिक्षणात तज्ञ मार्गदर्शक म्हणून काम केलेले असल्यास विविध स्तरावर
८. विद्यार्थ्यांच्या प्रज्ञेच्या शोध घेणाऱ्या परीक्षेतील वर्गातील एकूण विद्यार्थ्यांच्या तुलनेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे शेकडा प्रमाण शैक्षणिक क्षेत्राला व गुणवत्तेला स्वतःच्या नवप्रकल्पाद्वारे दिशा देणारे कार्य ज्ञानरचनावाद, डिजिटल स्कूल, इ. साहित्यनिर्मिती, वाचनप्रेरणा व इतर नवोपक्रम
९. शैक्षणिक स्पर्धातील विद्यार्थ्यांचा सहभाग विज्ञान प्रदर्शन, कला, क्रीडा स्पर्धा, साहित्य स्पर्धा, इन्स्पायर अवार्ड, कृती संशोधन

# हमीपत्र

**(बी. दि. चेंज फाऊंडेशन अंतर्गत राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६ साठी)**

मी, श्री/श्रीमती ..............................................................................

पद : .........................................................................................

शाळेचे नाव : ...............................................................................

तालुका : ............................ जिल्हा : ..............................................

सेवेत रुजू झाल्याची तारीख :     /     /२०

एकूण सेवा वर्षे : ............................

मी खालील बाबी स्वखुशीने, स्वेच्छेने व पूर्ण जबाबदारीने मान्य करतो/करते व त्यावर स्वाक्षरी करून लिखित हमी देतो/देते

१. माझ्याविरुद्ध कोणतीही फौजदारी / शिस्तभंगाची कारवाई प्रलंबित नाही, तसेच पूर्वी अशा कारवाईचा बडतर्फीचा इतिहास नाही.
२. मी माझ्या सेवाकाळात कुठल्याही प्रकारचे गैरवर्तन, भ्रष्टाचार, किंवा शिक्षक नैतिकतेला बाधक वर्तन केलेले नाही.
३. मी महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण सेवा नियमांचे व आचारसंहितेचे पूर्ण पालन करतो/करते.
४. मी पुरस्कारासाठी सादर केलेली सर्व माहिती खरी, अचूक व पडताळण्यायोग्य असल्याची खात्री देतो/देते. माहिती खोटी आढळल्यास, माझा पुरस्कार रद्द करण्यात यावा, यास माझी कोणतीही हरकत नाही.
५. पुरस्कार समारंभात सहभागी झाल्यानंतर माझ्याकडून कुठल्याही प्रकारचे गैरवर्तन झाल्यास, मी संबंधित शासकीय वा संस्थात्मक कारवायांस पात्र असेन, याची जाणीव आहे.
६. संस्थेचे निर्णय अंतिम असतील व मी त्यामध्ये कोणतीही बाधा निर्माण करणार नाही, याची हमी देतो/देते.
७. मी भरलेली नोंदणी फी ही पूर्णतः नॉन-रिफंडेबल आहे, याची मला पूर्ण जाणीव आहे व मी ते मान्य करतो/करते.
८. पुरस्कार निवड प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची शाश्वती अथवा हमी न देता पारदर्शक प्रक्रिया राबवली जाईल, हे मला ठाऊक असून मी यास संमती देतो/देते.
९. मला कार्यक्रमाच्या सर्व अटी, नियमावली व आयोजक संस्थेच्या धोरणांची कल्पना आहे व मी ती पूर्णपणे मान्य करतो/करते.

स्थळ : ........................

दिनांक :     /     /२०२६

स्वाक्षरी :

(शिक्षकाची स्वाक्षरी)

## स्पेशल फीचर्स



पुरस्कार विजेत्यांची
पारदर्शक निवड प्रक्रिया




आलेल्या सर्व प्रस्तावांचे
डिजिटल रेकॉर्ड मेंटेनन्स



ऑनलाईन पद्धतीने प्रस्ताव
दाखल सुविधा




ऑफलाईन पद्धतीने ही
प्रस्ताव दाखल सुविधा




रु.~~१००००/~~- मात्र
४९९९/-नामनिर्देशन शुल्क



संपूर्ण राज्यातून शिक्षक
निवडले जाणार



शैक्षणिक क्षेत्रातील राज्यातील
एक नावाजलेली संस्था



पुरस्कार सोहळ्याला सामाजिक
क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती



परिवारासह
उत्तम भोजन व्यवस्था

## राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५ ची क्षणचित्रे

दिनांकः २६ जुन २०२५
पुरस्कार प्रदान ठिकाणः शिर्डी, महाराष्ट्र





















चेंज फाउंडेशन




२०२५


शिर्डी, जिल्हा अहिल्यानगर, महाराष्ट्र




बी द चेंज फाउंडेशन




शिर्डी, जिल्हा अहिल्यानगर, महाराष्ट्र


शिर्डी, जिल्हा अहिल्यानगर, महाराष्ट्र


शिर्डी, जिल्हा अहिल्यानगर, महाराष्ट्र










बी द चेंज फाउंडेशन


बी द चेंज फाउंडेशन

# द्वितीय पुष्प...

दिनांक: २८ सप्टेंबर २०२५
पुरस्कार प्रदान ठिकाण: शिर्डी, महाराष्ट्र



















दैनिक
# सुफ्फा
आम आदमी की आवाज...

## समाज परिवर्तन के दीपस्तंभ प्रा. डॉ. अनिल भुरके को किया गया राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार से सम्मानित




**यवतमाल-(वासिक शेख)**
'बी द चेंज फाउंडेशन' द्वारा आयोजित राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५ समारोह में प्रा. डॉ. अनिल शिवाजी भुरके को उल्लेखनीय शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यों के लिए प्रथम क्रमांक से आदर्श शिक्षक पुरस्कार से सम्मानित किया गया। यह पुरस्कार २९ जून २०२५ को साई दरबारी, शिर्डी में आयोजित भव्य समारोह में प्रदान किया गया। इस अवसर पर उन्हें संपूर्ण परिवार सहित शाल, श्रीफल, प्रतिष्ठित मोबाइल कंपनी का स्मार्टफोन, सम्मान चिन्ह व प्रशस्ति पत्र प्रदान कर सम्मानित किया गया।

यह पुरस्कार नर्सरी से लेकर पीजी तक के १३०० नामांकनों में से केवल ४२ उत्कृष्ट शिक्षकों को दिया गया, जिनमें से जुनियर कॉलेज से पीजी वर्ग में सिर्फ ६ शिक्षकों का चयन हुआ। इस तरह मैं प्रा. डॉ. अनिल भुरके का चयन प्रथम क्रमांक पर हुआ, जो कि यवतमाल जिले व आदिवासी समाज के लिए गर्व की बात है। प्रा. डॉ. अनिल भुरके मूलतः मलकापूर विरखली (ता. महागांव, जि. यवतमाल) के अत्यंत साधनहीन आदिवासी समाज से आने वाले युवा है।

उन्होंने विपरीत परिस्थितियों में संघर्ष करते हुए शिक्षा प्राप्त की और संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ के अंतर्गत 'यवतमाल जिल्ह्यातील आदिवासी समाजाचे चिकित्सक अध्ययन (१९०१-२०००)' विषय पर पीएचडी पूर्ण की। इस शोधकार्य में उन्होंने संपूर्ण यवतमाल जिले में भ्रमण कर आदिवासी समाज के इतिहास, परंपरा, संस्कृति, धर्म, सामाजिक बदलाव, शिक्षा व राजनीति की दिशा पर गहन अध्ययन कर नया इतिहास रचा है।

वर्तमान में वे रामकृष्ण कनिष्ठ महाविद्यालय, दारापुर में इतिहास विभाग के प्राध्यापक हैं। वे विद्यार्थियों के प्रिय शिक्षक होने के साथ-साथ समाज परिवर्तन के वाहक भी हैं। उन्होंने छात्रों के सर्वांगीण विकास के लिए नाट्यकला, पथनाट्य, आदिवासी लोकनृत्य, व्यक्तित्व विकास कार्यक्रम, ऐतिहासिक स्थलों की यात्राएं, शैक्षणिक सहल आदि का आयोजन कर विद्यार्थियों को नवदिशा प्रदान की है।

---

दिव्य मराठी

बीड जिल्हा 01-07-2025

दिव्य मराठी

## न्यूज ब्रीफ

## अनुराधा लाहोरकर- खुरपे यांचा आदर्श शिक्षक पुरस्काराने केला सन्मान



**बीड|** शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या माजलगाव येथील श्री सिद्धेश्वर प्राथमिक विद्यालयाच्या सहशिक्षिका अनुराधा लाहोरकर (खुरपे) यांचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मान करण्यात आला. बी.द.चेंज फाउंडेशन, कोपरगाव. जिल्हा अहिल्यानगर तर्फे श्री साई पालखी निवारा, शिर्डी येथे राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळा- २०२५ पार पडला.

---

# मेहकर बुलेटिन एक्सप्रेस

## राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने साहेबराव अंभोरे सन्मानित




शिक्षक

**मेहकर बुलेटिन एक्सप्रेस**
बुलढाणा: मेहकर, तालुक्यातील पांगरखेड येथील जिल्हा परिषद मराठी उच्च प्राथमिक शाळेतील पदवीधर शिक्षक साहेबराव अंभोरे यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला आहे. गुणवत्ता वाढीसाठी शिक्षण क्षेत्रात राबविलेल्या नवीन संकल्पना, तंत्रज्ञानाचा वापर, गायन कलेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील खेडेपाडे, वाडी वस्ती तांडे, दऱ्याखोऱ्यातील आदिवासी गावे यामध्ये करत असलेले समाज प्रबोधनाचे गुणवत्तापूर्ण कार्यासाठी, शिक्षण क्षेत्रातील योगदान व समाजात सकारात्मक परिवर्तन घडवणाऱ्या कार्याबद्दल बी द चेंज फाउंडेशन निवड समिती कोपरगाव यांनी त्यांची सदर पुरस्कारासाठी निवड केली.

दिनांक २९/०६/२०२५ रोजी शिर्डी येथे मा. पद्मश्री डॉ. पोपटराव पवार कार्याध्यक्ष, आदर्श गाव योजना,महाराष्ट्र शासन यांचे हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी प्रातिनिधिक स्वरूपात त्यांचा मुलगा राहुल साहेबराव अंभोरे यांनी पुरस्कार स्विकारला. आजच्याच दिवशी त्यांना कोल्हापूर येथे अजून एक पुरस्कार राजर्षी शाहू राष्ट्रीय सन्मान पुरस्कार २०२५ मिळाला आहे.

सदर पुरस्कार स्विकारण्यासाठी ते सहकुटुंब कोल्हापूर येथे गेलेले असल्याने शिर्डी येथील पुरस्काराला ते उपस्थित राहू शकले नाही. बी द चेंज फाउंडेशन दरवर्षी राज्यातील होतकरू शिक्षकांना पुरस्कार प्रदान करते. राष्ट्र उभारणी व समाज विकासाचे कार्य करण्याला शिक्षकांना प्रेरणा मिळावी हा उद्देश. या यशाबद्दल साहेबराव अंभोरे यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. या पुरस्कारामुळे मला कार्य करण्यास नवऊर्जा, प्रेरणा मिळाली आहे असे त्यांनी मत व्यक्त केले.

---

## सचिन डांगे यांना राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान



**राहाता (वार्ताहर)–** शिक्षण, मार्गदर्शन आणि समाजप्रबोधन क्षेत्रात दोन दशकाहून अधिक काळ सातत्यपूर्ण कार्य करणारे दहेगाव येथील सुपुत्र सचिन अशोक डांगे यांना राज्य आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. बी द चेंज फाउंडेशन या संस्थेच्या वतीने दिला जाणारा हा मानाचा पुरस्कार शिर्डी येथे प्रदान करण्यात आला. यावेळी पोपटराव पवार, प्रसन्न पोपटराव पवार, काका कोयटे, स्वरूप कापे, आणि मयूर ढोकचौळे उपस्थित होते. या सर्वांनी डांगे यांच्या कार्याचा गौरव करत त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. समारंभात श्री. डांगे यांना सन्मानचिन्ह, प्रशस्तिपत्रक देऊन गौरविण्यात आले. श्री. डांगे यांनी अहिल्यानगर, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, पुणे, सोलापूर आदी जिल्ह्यातील हजारो विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आहे. पुरस्कार स्वीकारताना डांगे म्हणाले, हा सन्मान माझ्या आत्मा मालिक माऊलींचा, माझ्या शाळेचा म्हणजेच आत्मा मालिक संकुलाचा, कुटुंबाचा, विद्यार्थ्यांचा आणि माझ्या गावाचा व कार्यक्षेत्राचा आहे. शिक्षण क्षेत्रात अधिक व्यापक आणि सकारात्मक परिवर्तन घडवण्यासाठी मी यापुढेही योगदान देत राहीन. तसेच मला मिळालेले हे यश मी विनम्र भावनेने परमपूज्य आत्मा मालिक माऊली व साईबाबांच्या चरणी अर्पण करतो.

---

# नेशन महाराष्ट्र
हाक तुमची साथ आमची

गुरुवार दि ३ जुलै २०२५ नेशन महाराष्ट्र संपादक हेमकांत गायकवाड

## विभागीय सचिव प्रा राजेंद्र चव्हाण आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित...

भरत कोळी यावल
ता.प्रतिनिधी

### कनिष्ठ महाविद्यालयीन इतिहास परिषदेला बहुमान




कनिष्ठ महाविद्यालयीन इतिहास परिषदेच्या नाशिक विभागाचे सचिव तथा मराठा विद्या प्रसारक संस्था जळगाव संचलित श्री शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय हातेड येथील कनिष्ठ महाविद्यालयातील प्रा. राजेंद्र साहेबराव चव्हाण यांना नुकत्याच राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने शिर्डी येथे सन्मानित करण्यात आले. बी द चेंज फाउंडेशन शिर्डी ,अहिल्यानगर संस्थेच्या वतीने देण्यात येणारा आदर्श शिक्षक पुरस्कार पटकावत त्यांनी शाळेसोबतच परिषदेचा ही नावलौकिक वाढविला आहे.आपल्या अध्यापनासोबतच विविध उपक्रम राबवत त्यांनी आपल्या कार्यक्षमतेची छाप निर्माण केली आहे. त्यांच्या या कार्याला प्रेरणा मिळावी म्हणून बी द चेंज फाउंडेशन च्या वतीने त्यांचा हा गौरव करण्यात आला आहे.

प्रा. राजेंद्र चव्हाण हे यशाप्रीत्यर्थ कनिष्ठ महाविद्यालयीन इतिहास परिषदेचे राज्य कार्याध्यक्ष आदरणीय प्रा. सुनील शिंदे, राज्य उपाध्यक्ष, सौ स्मिता जयकर, राज्य सचिव डॉ. नितिन देवतळे, राज्यकोषाध्यक्ष प्रा. रंजन चौधरी, प्रा. बाळासाहेब चावरे, प्रा भुजाबा माने, प्रा. अभिजीत पवार, कनिष्ठ महाविद्यालयीन इतिहास परिषदेचे नाशिक विभाग अध्यक्ष आदरणीय प्रा. साहेबराव कासव, नाशिक विभाग कार्यकारणी सदस्य पंकज शिंदे तसेच राज्य कार्यकारणी आणि विविध विभाग तसेच जिल्हा कार्यकारणी मधील सर्व मान्यवर पदाधिकारी यांनी त्यांचे अभिनंदन करत त्यांना पुढील कार्याच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

---

# सकाळ

## शिक्षक अनुराधा लाहोरकर पुरस्काराने सन्मानित



शिर्डी (जि. अहिल्यानगर) : अनुराधा लाहोरकर यांचा सन्मान करण्यात आला.

**बीड :** माजलगाव येथील श्री सिद्धेश्वर विद्यालयाच्या सहशिक्षिका अनुराधा लाहोरकर (खुरपे) यांना बी द चेंज फाउंडेशन (कोपरगाव, जि. अहिल्यानगर) यांच्या वतीने आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. शिर्डी येथे पुरस्काराचे वितरण झाले. पद्मश्री डॉ. पोपटराव पवार, ओमप्रकाश कोयटे, प्रसन्न पवार, मयूर ढोकचौळे, स्वरूप कापे, अभिषेक तुपे यांच्या हस्ते त्यांना सन्मानित करण्यात आले. शिक्षण व साहित्य क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांचा या पुरस्काराने गौरव करण्यात आला.

Aurangabad, Beed-Today
02/07/2025 Page No. 4




# बी द चेंज फाउंडेशन (रजि.)

**रजिस्टेशन नंबर:-MH/220/22**

**कार्यालयीन पत्ता:**

बी. द. चेंज फाउंडेशन
दूसरा मजला, जानकी प्लाझा, भगवान महावीर पथ कोपरगाव,
ता. कोपरगाव, जि. अहिल्यानगर ४२३६०१
+९१ ८७९६६९६९६०, ७२१९१५७६४९
shikshakpuraskar2025@gmail.com